शनिवार, दि. ४ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ४६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# वाह रे... जालना पोलीस! डिजेचे फोटो काढण्यात हुशार; गुटखा माफियांच्या गाड्या मात्र सुरक्षित!

**दीपक शेळके**

**जालना -** शहरात माता विसर्जन निमित्त काही ठिकाणी डिजे वाजविण्यात आले. काहींनी साऊंडसाठी कायदेशीर परवानगी घेतली होती, तर काहींनी विना परवाना लावले. मात्र, पोलिसांनी जिथे-जिथे आवाज ऐकू गेला, अगदी कमी डेसिबलवरही डिजे वाजत होता तिथे धडधड पोहोचून फोटो-व्हिडीओ काढले.

> मागच्या एक-दोन दिवसांपासून सतिश उर्फ लालाच्या गुटख्यांच्या गाड्या शहरात येण्यासाठी आतुरलेल्या आहेत. याची भनक पोलीस प्रशासनला नाही का? आता जागृक नागरिकांना गुटखा बंदी स्कॉड तयार करावा लागेल का? पोलीसांच्या अकार्यक्षमतेमुळे आगामी काळात युवा रक्षक म्हणून काही युवकांनी पुढे येऊन गुटखा असलेल्या गाड्या थांबविल्यास व पोलीसांच्या हवाली केल्यास नवल वाटायला नको. नंतर पोलीसांनीच कायदा हाती घेऊ नका म्हणून ओरड करू नये म्हणजे झालं. हा गुटखा घातक आहे, हे गुटखा बंदीच्या एका तपानंतरही पोलीसांच्या लक्षात आले नाही; म्हणजे फार मोठे आश्चर्य आहे.

तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पुष्पक नगर भागातील एका डिजेवाल्याचा अनुभव तर वेगळाच. त्या डिजेचा आवाज दत्त मंदिरापर्यंत ऐकू गेला, असे पोलीस सांगत होते. पण हा दावा कितपत खरा? एखाद्या प्रचंड क्षमतेच्या डिजेचा आवाजसुद्धा सिंदखेडराजा चौफुलीपासून दत्त मंदिरापर्यंत ऐकू जाणे संशयास्पद आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने डिजेवर सरसकट बंदी घातलेली नाही. फक्त आवाजाच्या मर्यादा (५५ डेसिबल रात्री, ७५ डेसिबल दिवसा - परिसरानुसार) घालून दिलेल्या आहेत. म्हणजेच मर्यादित आवाजात, परवानगी घेऊन डिजे वापरण्यास कायदेशीर अडथळा नाही.

मात्र जालन्यातील पोलीस कमी आवाजात वाजणाऱ्या डिजेवाल्यांनाही विनाकारण त्रास देत आहेत, ही तक्रार वारंवार पुढे येत आहे.

पण मोठा प्रश्न असा आहे की, ज्या तत्परतेने पोलीस डिजेचे फोटो काढतात, त्याच तत्परतेने लाल रंगाचा राजा गुटखा माफिया सतिश उर्फ लाला यांच्या गोदामांवर, उतरणाऱ्या गुटख्याच्या गाड्यांवर कारवाई का होत नाही? लाखोंचा गुटखा जालना शहरात उतरतोय.

मागच्या एक दोन दिवसांत लालाच्या गुटख्याच्या गाड्या शहरात उतरण्यासाठी उतावीळ झाल्याची माहिती नागरिकांना होते. मग ही भनक पोलीसांना कशी लागत नाही? पोलिसांचे आर्थिक हितसंबंध गुटखा माफियाशी जोडलेले आहेत काय? अशी शंका तीव्र होते.

डिजे व्यवसाय हा हंगामी व्यवसाय. सण-उत्सवातच त्यांची कमाई होते. जर पोलिसांनाही काही आर्थिक अपेक्षा असतील, तर ते डिजेवालेही काही भाग देण्यास तयार आहेत. निदान आमचा व्यवसाय बंद करून उपासमारीला लावू नका, असेच एका डिजे मालकाने संतप्तपणे सांगितले.

गुटखा विक्रीवर महाराष्ट्र सरकारने कायदेशीर बंदी घातली आहे. बंदी घालून एक तप उलटत आहे. तरीसुद्धा जालन्यात गुटख्याच्या गाड्याच्या गाड्या सर्रास उतरत आहेत. पोलिसांकडून छापे नाहीत, गाड्या जप्त होत नाहीत. दाखविण्यापुरती कारवाई अधून-मधून केल्या जाते. अन्यथा पोलीसांचे आर्थिक हितसंबंध हे सतिश उर्फ लाला याच्याशी असल्याचे नाकारता येणे शक्य नाही.




**पोलिसांना दिसतो डिजे, दिसत नाही का गुटख्याच्या गाड्या?**

जालना पोलिसांनी आता गुटखा माफिया लालाचा लाल रंग कायमचा शहरातून हद्दपार करावा., अन्यथा नागरिक गुटखा बंदी स्कॉड म्हणजे उभारून स्वतःच गाड्या पकडून पोलिसांच्या हवाली करतील. आगामी काळात युवा रक्षक म्हणून युवकच पुढे आले, तर आश्चर्य वाटायला नको. डिजेवर दडपशाही आणि गुटखा माफियांना मूकसंमती हे दुहेरी धोरण थांबले पाहिजे, अशी जनतेची ठाम मागणी आहे.

---

युवा आदर्श

## गरीब केवळ ...

गरिबांची लागे गरज
मतदानापुरती केवळ
जिंके पर्यंत इलेक्शन
भरवे सोन्याचे कवळ
घर ऑफिस कामाला
नोकर असावे जवळ
ते नंतर लांब सोडावेत
नकोशी ढवळा ढवळ
करू द्या साफसफाई
हे शहर देखणे निर्मळ
कुड्या कचऱ्यासोबत
बाहेर टाका मळ मळ
आंदोलने मोर्चे रॅलीला
उपयोग असे निव्वळ
गर्दी साठी आवश्यक
गरीब जरुरीचे निखळ
ट्रक भरभरून आणा
भाड्याने मिळे दुर्बळ
लावा गुन्हेगारी लेबल
पुरावे दाखवून सबळ
दंगली साठी हेचंयोग्य
जेल भरो करा सकळ
दारिद्रय निर्मूलन भले
पांढरे केल्यावर उखळ
आवश्यक हा चिखल
फुलण्या साठी कमळ
डाग नकोत पडायला
नको अधिक तळमळ

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

# जालना जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी काँग्रेसचे आंदोलन; तातडीच्या मदतीची मागणी

## अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडू - खा. डॉ. काळे

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्यासाठी जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवार (दि. ३ ऑक्टोबर) रोजी येथील महात्मा गांधी पुतळ्यासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करून शासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, पीक नुकसानीचे सरसकट पंचनामे करून तातडीने मदत जाहीर करावी., शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी., शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी., नुकसानीची माहिती दडपणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. केंद्र सरकारने तात्काळ १००% अनुदानावर मदत पॅकेज द्यावे. अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरींना NDRF किंवा SDRF मधून प्रत्येकी ५ लाखांची विनाअट मदत द्यावी.

या प्रसंगी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर शेतकऱ्यांना तातडीने मदत दिली नाही, तर काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून सरकारविरुद्ध तीव्र आंदोलन उभारेल.

यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, महाराष्ट्र उपाध्यक्ष राजेंद्र राख, किसान काँग्रेस जिल्हाध्यक्ष नारायण वाढेकर, शहराध्यक्ष अतिक खान, तालुका अध्यक्ष कृष्णा पडुळ, उपाध्यक्ष बदर चाउस, माजी सभापती अब्दुल रऊफ परसूवाले, सेवादल जिल्हाध्यक्ष इब्राहिम शेख, नगरसेवक शकील शेख, ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर भांदरगे, खलील शेख, अजय बनकर, कल्याण तारडे, लक्ष्मण मसलेकर, श्रीरंग कामठे, बाळासाहेब आकांत, वसीम शेख, इकबाल कुरैशी, फकीरा वाघ, विष्णु भालेराव, अब्दुल हमीद, माउली इंगोले, माजी सभापती सोपान तिरोखे, शिवाजी लोखंडे, समीर शेख, सूरज यंगटवार, बाबासाहेब सोनावणे, जावेद कुरैशी, जावेद बेग, युनुस शेख, सुरेश गवली, ज्येष्ठ नेते राजेंद्र गोरे, पान २ वर

---

# मराठवाड्यातील विद्यार्थ्यांची फी माफीसाठी निवेदन




**धाकलगांव । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील अनेक भागामध्ये विशेषत: मराठवाडा विभागात अतिवृष्टी आणि गोदावरी नदीच्या महापुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. या आपत्तीमुळे शेतकरी कुटुंबे आर्थिक संकटात सापडली असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर अंबड येथे तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची ट्युशन फी व परीक्षा फी तसेच दहावी-बारावी बोर्डाच्या परीक्षेची फी शासनामार्फत माफ करण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत, ओल्या दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक आर्थिक सहाय्य जाहीर करावे. शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसोबत ट्युशन व परीक्षा फी पूर्णपणे माफ करावी. पुरग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षण शासनाने निःशुल्क करावे. ओला दुष्काळ जाहीर करून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबरोबरच विशेष आर्थिक मोबदला द्यावा.

निवेदन देताना ॲड. मोहन रोटे, ॲड. कृष्णा साबळे, शरद खरात, ज्ञानेश्वर बोडकखे, ॲड. विलास राठोड, अभिषेक खरात आदी उपस्थित होते.

---

# स्त्री नैसर्गिक शक्तिमान; तिच्या पाठीवर कौतुकाची थाप पडल्यास तिला अधिक लढण्याचे बळ मिळते - संजीवनी तडेगावकर

## आधार ग्रुपने केला विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान महिलांचा गौरव

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या स्त्रीशक्तीचा शहरात सदैव सक्रीय असणाऱ्या आधार ग्रुपच्या वतीने शहरातील संभाजीनगर प्रभागातील शांतिनिकेतन विद्यामंदिर येथे गौरव करण्यात आला. व्यासपिठावर आधार ग्रुपचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे आयोजक अश्विन भास्करराव अंबेकर, शहरप्रमुख बाला परदेशी, दुर्गेश काठोठीवाले, पंडितराव लव्हटे यांच्यासह ग्रुपचे सदस्य कुणाल देशमुख, संदीप मगर, आकाश बारगजे, अभिमन्यू काठोटीवाले, ज्ञानेश्वर बदर, भूषण वानखेडे, गौरव इंगळे आदींची उपस्थिती होती. यावेळी आरोग्य क्षेत्रातून शुभांगी छडीदार राऊत, सेवा क्षेत्रातून आनंदी अय्यर, क्रीडा क्षेत्रातून तेजल साळवे, स्वच्छता क्षेत्रातून कांताबाई घुले, उद्योग क्षेत्रातून संजीवनी जाधव, शिक्षण क्षेत्रातून डॉ.शिवनंदा मेहत्रे, कृषी क्षेत्रातून उमा क्षीरसागर, कृषी जोड उद्योग अंकिता मोरे, वैमानिक गार्गी गिरी, यांना नवदुर्गा पुरस्कार तर शिलाताई ढाकणे यांना जीवनगौरव देऊन कवयित्री संजीवनी तडेगावकर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मानाचे स्वरूप साडी-चोळी, शाल, गौरवपत्र व भेटवस्तू देऊन असे होते.



यावेळी प्रसिद्ध साहित्यिक संजीवनी ताडेगावकर यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, स्त्रीमध्ये मुळातच संघर्ष करण्याची नैसर्गिक शक्ती आहे. विपरीत परिस्थितीत संसाराचा गाडा त्यांना हाकावा लागतो. आजही स्त्रीला संघर्ष करूनच आपले अस्तित्व सिद्ध करावे लागते. स्त्रियांना संघर्षाशिवाय काहीच मिळत नाही. स्त्रीला दुर्बल समजून दुय्यम वागणूक देणे योग्य नसून प्रत्यक्षात ती प्रचंड शक्तिशाली आहे. सर्वच भगिनींनी विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. पुरुषांशी तुलना केल्यास स्त्रिया ह्या अधिक प्रामाणिक, निर्व्यसणी याप्रमाणे सर्व गुणसंपन्न असतात हे सिद्ध होते. आधार ग्रुपचे अध्यक्ष अश्विन भास्करराव अंबेकर यांचे कौतुक करते की, वडील राजकारणी असतानाही त्यांनी आधार ग्रुपच्या माध्यमातून राजकारणाऐवजी पान २ वर

# रावण दहनाचा कार्यक्रम राजीव गांधी पार्क गणेशनगर येथे उत्साहात



**नागपूर । प्रतिनिधी -** गेल्या २२ वर्षांपासून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विजयादशमी निमित्त रावण दहणाचा कार्यक्रम राजीव गांधी पार्क, गणेशनगर, नागपूर येथे नवज्योत क्रीडा मंडळ व आयोजक प्रशांत धवड आणि मित्र परिवारा तर्फे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरांनी विजयादशमी निमित्त आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी अनेक मान्यवरांचा सत्कार माजी नगरसेवक प्रशांत धवड यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष उमाकांत अग्निहोत्री महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस महासचिव प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेसचे वरीष्ठ नेता डॉ. विठ्ठलराव कोंबाडे, नवज्योत क्रिडा मंडळांचे अध्यक्ष रघुवीरसिंग ठाकुर, राजु खोपडे, संजु रनदिवे, डॉ. उत्तमराव तुरणकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी भक्तीसंगिताचा कार्यक्रम गायक महेंद्रकुमार व रजनी सोनी यांच्या गाण्यांनी संपूर्ण जनसमुदायाचे मनमोहुन घेतले.उत्कृष्ट रावणाची कलाकृती प्रसिद्ध कलाकार अमरसिंह बिलवार व आसिप यांनी निर्माण केली व फटाका शो आगळावेगळा रंग देण्याचे काम कारवटकर यांनी केले व भव्य फटाका शो ला सुरूवात झाली. फटाका शोचा आनंद हजारो नागरिकांनी मोठ्या उत्साहाने घेतला फटाका शो नंतर हजारो नागरिकांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते रावण दहन करण्यात आले.

या कार्यक्रमाला विलास घोराडकर, मुरलीधरराव भोंडे, अशोक दुरबुडे, नरेंद्र ताले, मुरमे, दीपक गुरवे, श्रीरीषजी लड्ढा,प्रवीण भोयर,विलास गावंडे,सौ.अंजली ठाकरे, सौ. अर्चना गोल्हर, जनार्धन चरडे, लक्ष्मीकांत ठाकरे, डॉ.नाईक, निलेश चंद्रिकापुरे, राजु डोबले, शुभम रणदीवे, श्रीकांत धांडे, आदित्य येरपुडे, ऋषिकेश तुमाने, श्लोक रोंघे, आदित्य बाविस्कर, अक्षय ठाकरे, अक्षय तितरमारे, कार्तीक धांडे बाबाराव व्यापारी, योगेशजी बावनकर, रमेश काकडे, इत्यादीसह अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रमेश लांजेवार यानी केले आणि आभार प्रदर्शन एकनाथ काळमेघ यानी केले.

# माध्यमभूषणने माध्यमांचे अंतरंग समजण्यास मदत होईल - रवींद्र गोळे

**मुंबई -** माध्यमभूषण या पुस्तकात पत्रकार, संपादक, आकाशवाणी, दूरदर्शनचे निर्माते, कॅमेरामन,संकलक, रंगभूषाकार, चित्रपट जगतातील पटकथा लेखक, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, जाहिरात, जनसंपर्क, प्रकाशन अशा विविध माध्यमातील व्यक्तींच्या जीवन कथा उलगडल्याने, त्या त्या माध्यमांचे अंतरंग समजून घेणे वाचकांना नक्कीच आवडेल, असा विश्वास रवींद्र गोळे यांनी व्यक्त केला. रवींद्र गोळे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते माध्यमभूषण पुस्तकाचे प्रकाशन मुंबईत नुकतेच करण्यात आले, त्या प्रसंगी ते बोलत होते.

श्री गोळे पुढे म्हणाले की, विविध माध्यमांमधून विविध सेलिब्रिटी, विविध घटना, प्रसंग, कथा नेहमीच आपल्यासमोर येत असतात. पण हे सर्व आपल्यासमोर सादर करणाऱ्या व्यक्ती नेहमीच पडद्याआड राहून आपली भूमिका बजावत असतात. या पुस्तकामुळे अशा सर्व व्यक्तींचे योगदान किती अमूल्य आणि अपरिहार्य असते हे आपल्याला जाणून घेता येईल.

अमेरिकास्थित ज्येष्ठ अभियंते तथा सामाजिक बांधिलकी मानणारे विनोद बापट या वेळी बोलतांना म्हणाले की, या पुस्तकात भारताबरोबरच अमेरिका, सिंगापूर, नेदरलँड्स या देशातील व्यक्तींच्या जीवन कथा आणि त्यांचे माध्यमातील कार्य यावरही लिहिले असल्याने त्या त्या देशातील जीवन, समाज रचना, भारतीय व्यक्तींचे योगदान वाचकांना कळू शकेल.

रामायणफेम कॅमेरामन अजित नाईक यांनी सांगितले की, आपण आयुष्यभर कॅमेऱ्यामागे राहून काम करीत आलो आहोत. पण या पुस्तकाच्या निमित्ताने पहिल्यांदाच कॅमेऱ्यापुढे आलो आहोत, असे सांगून त्यांनी सर्व तंत्रज्ञांच्यावतीने लेखकाचे आभार मानले.

दूरदर्शन निर्माती मीना गोखले यांनी देवेंद्र आणि अलका भुजबळ यांनी निवृत्तीनंतर स्वस्थ न बसता ते विविध माध्यमांद्वारे समाजात सकारात्मकतेचा संदेश देण्यात महत्वाची भूमिका बजावत असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

प्रास्ताविक करताना पुस्तकाचे लेखक देवेंद्र भुजबळ म्हणाले की, आपल्या आजवरच्या वाटचालीत भेटलेल्या आणि भावलेल्या व्यक्तींविषयी या पुस्तकात लिहिले आहे. खरं म्हणजे या व्यक्तींच्या जीवनावर एकेक पुस्तक होईल, इतके त्यांचे कार्य मोठे आहे. या पुस्तकाची अतिशय देखणी आणि दर्जेदार निर्मिती केल्याबद्दल त्यांनी ग्रंथालीचे आभार मानले.

**हे आहेत माध्यमभूषण !**

सर्वश्री पद्मश्री मधु मंगेश कार्णिक, याकूब सईद, प्रो. सुरेश पुरी, प्रदीप दीक्षित, अण्णा बेटावदकर, वासंती वर्तक, प्रकाश बाळ जोशी,डॉ. किरण चित्रे,बी.एन.कुमार, शिवाजी फुलसुंदर, मधु कांबळे, डॉ. महेश केळुस्कर, अविनाश पाठक, रोनिता टोरकाटो, अजित नाइक, नितिन सोनावणे, प्रणिता देशपांडे (नेदरलँड्स) शोभा जयपुरकर, विनय वैराळे, विनोद गणात्रा, सिद्धार्थ कुलकर्णी, किसान हासे, माधव गोगावले (अमेरिका), प्रो. डॉ. सुचिता पाटील, रत्नाकर तारदाळकर, मेघना साने, राजू झणके, रणजीत चंदेल, शिवानी गोंडाळ, नितिन बिनेकर, स्मिता गव्हाणकर, मर्मबंधा गव्हाणे, नीला बर्वे ( सिंगापूर), सुदेश हिंगलासपुरकर, मीना घोडविंदे, डॉ. सुलोचना गवांदे (अमेरिका).



# आईच्या स्मृती प्रित्यर्थ नळविहीरा शाळेला दिला स्मार्ट टीव्ही भेट

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील रहिवाशी तथा छत्रपती संभाजी नगर येथील प्रभालका इंजिनिअरिंगचे मालक तथा युनायटेड इंजिनिअरिंग असोसिएशन चे राज्य कोषाध्यक्ष रोशन पिंपळे यांनी नवरात्रीनिमित्त आपल्या दिवंगत आईच्या स्मृती प्रित्यर्थ नळविहीरा ता. जाफराबाद येथील जिल्हा परिषद शाळेला एक ४३ इंची स्मार्ट टीव्ही भेट दिला आहे. गेल्या नऊ दिवसापासून नवरात्रीची धूम सुरू होती. नळविहीरा येथील जिल्हा परिषद शाळेचे उपक्रमशील शिक्षक तथा जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेचे माजी चेअरमन विनोद कळंबे यांनी त्यांचे मित्र तथा अभियंता रोशन पिंपळे यांना नळविहिरा येथील जिल्हा परिषद शाळेला एक स्मार्ट टीव्ही देण्याचे आवाहन केले होते या आवाहनाला प्रतिसाद देत श्री पिंपळे यांनी आपली दिवंगत आई कै.अलका प्रभाकर पिंपळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नवरात्रीचा मुहूर्त साधून नळविहीरा शाळेला ४३ इंची स्मार्ट अँड्रॉइड टीव्ही भेट दिली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर गाडेकर, सुनिल गायकवाड, परमेश्वर मोरे, अनिल मोरे, यांच्यासह मुख्याध्यापक शिवहरी नागरे,दत्तू मुनेमाणिक,सुनील अंभोरे काशिनाथ उखर्डे ,विनोद कळंबे दीपक चव्हाण, ज्ञानेश्वर झगरे,मंजुषा बकतकार, पूजा चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.




# आधार कार्डसाठी सुधारित दर लागू

**जालना -** आधार सेवांबाबत भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण यांच्याकडून सुधारित दर लागू करण्यात आले आहेत. दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिध्द कार्यालयीन पत्रानूसार आधार नोंदणी, बायोमेट्रीक अद्ययावत व इतर सेवा यासाठी नवे दर निश्चित करण्यात आले आहेत. हे दर दि.१ ऑक्टोबर २०२५ पासून ३० सप्टेंबर २०२८ पर्यंत लागू राहतील, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. सुधारित दरानूसार ० ते १७ वर्षे वयोगटासाठी पुर्णपणे मोफत राहील. इतर बायोमेट्रीक अपडेटसाठी नागरिकांना १२५ रुपये व डेमोग्राफिक अपडेटसाठी ७५ रुपये शुल्क आकारले जाईल. घरपोच आधार नोंदणी, अद्ययावत सेवेसाठी ७०० रुपये जीएसटी शुल्कासह आकारले जातील. त्याच पत्यावर दुसऱ्या व्यक्तीसाठी ३५० रुपये शुल्क आकारले जाईल. जिल्ह्यातील सर्व आधार नोंदणी केंद्रांना सुधारित दरानूसार सेवा देण्याचे निर्देश आहेत.

# आयटी क्षेत्रातील कर्मचा-यांवर व्यवस्थापकीय संकट

## नामांकित टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस वादाच्या चक्रव्युहात

भारतातील सर्वात मोठी आयटी कंपनी असलेल्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) ला कधीकाळी नोकरीच्या स्थिरतेसाठी 'सरकारी नोकरी'चा दर्जा देण्यात आला होता. पण, आता भारतातील सर्वात मोठी आयटी कंपनी टीसीएस एका मोठ्या वादाचे केंद्रबिंदू बनली आहे. टीसीएस सध्या मोठ्या अंतर्गत संकटाचा सामना करत आहे. दोन महिन्यांपूर्वी कंपनीने जागतिक स्तरावरील आपल्या एकूण कर्मचा-यांपैकी सुमारे २ टक्के म्हणजेच अंदाजे १२,००० कर्मचा-यांची कपात करण्याची घोषणा केली होती. आता या निर्णयाचे गंभीर परिणाम दिसू लागले असून, कर्मचा-यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कार्यालयांमधून अनेक कर्मचा-यांनी गंभीर तक्रारी केल्या आहेत. राजीनामा देण्यासाठी कर्मचा-यांवर पद्धतशीरपणे दबाव आणला जात आहे. अचानक नोकरीवरून काढून टाकने आणि मानवी संसाधन (एचआर) विभागाकडून छळ अशा गोष्टींना सामोरे जावे लागत आहे. कंपनी या कपातीला भविष्यासाठी तयार होणारी संस्था बनवण्याचे पाऊल म्हणत असली तरी, कर्मचारी मात्र असुरक्षिततेची भावना अनुभवत आहेत. जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील मंदी, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चा वाढता वापर आणि अमेरिकेतील व्हिसा शुल्क वाढ यामुळे कंपनीने हा निर्णय घेतला असला तरी, याचा थेट फटका कर्मचा-यांच्या मानसिक आणि आर्थिक स्थैर्याला बसत आहे.

सध्या आयटी क्षेत्रामध्ये भविष्याबद्दल चिंता आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी टीसीएस आपल्या २ टक्के कर्मचा-यांना श्रीफळ देणार असल्याचे समोर आले होते. त्यानंतर आता २ महिन्यानंतर त्याचे परिणाम दिसत आहेत. टीसीएसकडून अनेक कर्मचा-यांना घरचा रस्ता दाखवला जात आहे. अनेक कर्मचा-यांना सक्तीने राजीनामा देण्यास भाग पाडत असल्याचे समोर आले आहे. कर्मचारी कपातीच्या वृत्तामुळे आयटी क्षेत्रामध्ये एकच खळबळ उडाली आहे. टीसीएससारख्या मोठ्या आयटी कंपनीमध्ये कर्मचा-यांना सक्तीने राजीनामा देण्याची आणि नोकरीवरून काढून टाकण्याची लाट सुरू झाली. कर्मचा-यांवर एचआरकडून नोकरी सोडण्यासाठी दबाव टाकला जात आहे. कर्मचा-यांचे वाईट अनुभव सोशल मीडियावर भयान वास्तव मांडत आहे. त्या वास्तव्यात कर्मचा-यांच्या व्यथा अन् अडचणी दिसत आहेत. अचानक नोकरी गमावण्यामुळे वैयक्तिक आयुष्यात होणा-या गंभीर परिणामांवर कर्मचा-यांनी चिंता व्यक्त केली आहे.

टीसीएससारख्या मोठ्या कंपनीमध्ये कर्मचारी कपात सुरू आहे. जबरदस्तीने राजीनामा देण्यास भाग पाडल्याचा आरोप अनेक कर्मचा-यांनी केला आहे. कर्मचा-यांनी सोशल मीडियावर कंपनीतील अनुभव शेअर केले आहेत. टीसीएसमधून एका कर्मचा-याला कामावरून काढून टाकले. आपली नोकरी गेली, हे तो कुणाला सांगूही शकत नाही. तो आता बेरोजगार आहे. अचानक नोकरी गेल्याचे सत्य त्या तरुणाने अद्याप घरी सांगितलेलं नाही. तो अद्याप मानसिक तणावात अन् चिंतेत आहे. त्या तरुणाला एचआरने जबरदस्तीने राजीनामा दिला.

दुस-या एका कर्मचा-याने रेडिटवरील पोस्टमध्ये म्हटले, मला राजीनामा देण्यास सांगितले. राजीनामा देण्यास मी नकार दिला. त्यांच्यासमोर मी रडत होतो. घाबरत मी त्यांना नोकरीवरून काढू नका अशी विनंती केली. टीसीएस ही माझी पहिली कंपनी आहे, असे मी त्यांना सांगितले. पण त्यांनी मला धमकी दिली. आम्ही नोकरीवरून काढून टाकल्यानंतर वाईट रिव्ह्यू देऊ असे मला धमकावले. त्यावर मीही म्हणालो, ठीक आहे. तुम्हाला आवडेल तसं करा. मी काहीही केलं तरी राजीनामा देणार नाही. मी प्रचंड रडत होतो, घाबरलो होतो... मला नोकरी जाण्याची भीती वाटत होतीच. पण मी त्यावेळी खंबीर राहण्याचा प्रयत्न केला.

तिस-याने आपला अनुभव सर्वांसमोर ठेवत म्हटले की, टीसीएसमधील पॅनेल माझ्या राजीनाम्याची वाट पाहत होते. मी दररोज ७ ते ९ तास काम करतो. तरीही जवळच्या ठिकाणी रिपोर्टिंग का करतो? असा प्रश्न मला एचआरने विचारला. त्यावर मी म्हणालो की, आरएमजीने याबाबत मला कधीही काहीही सांगितले नाही. मला कोणताही मेल आलेला नाही. मी नेहमीच प्रत्येक कॉल, प्रत्येक मेल, प्रत्येक जीचॅट संदेश अटेंड केला. नेहमीच काम करतो, असे त्यांना सांगितले. माझ्या कुटुंबातील मी एकमेव कमावता आहे. नोकरी गेली तर लग्नही रद्द होईल, मला नोकरीवरून काढू नका, कुटुंब माझ्यावर अवलंबून आहे, असे मी त्यांना विनवणी करून सांगितले. पण एचआरने मला राजीनामा देण्यास जबरदस्ती केली, असेही त्याने सांगितले. दरम्यान, माझीही नोकरी गेली आहे. मी सध्या बेरोजगार असून नोकरीच्या शोधात आहे. पण टीसीएसमधील अनुभवामुळे मला अपमानित अन् निराश वाटते.

चौथ्या कर्मचा-याने आपला अनुभव सांगितला. त्याने टीसीएसमध्ये १३ वर्षे काम केले होते. त्याला सुमारे पाच महिने सतत छळ आणि दबावाचा सामना करावा लागला. त्याचे प्रकल्प नाकारले गेले, धमक्या देण्यात आल्या आणि अखेरीस राजीनामा देण्यास सांगितले गेले. त्याने राजीनामा देण्यास नकार दिल्यावर त्याची नोकरी २०२५ च्या मध्यापर्यंत संपुष्टात आणली गेली. दहा वर्षांहून अधिक काळ ज्या टाटा ग्रुप कंपनीशी तो एकनिष्ठ राहिला, तिने त्याचा विश्वासघात केला. त्याला 'बेंच'वर असतानाच्या कालावधीसाठी ६-८ लाख रुपये परत करण्यास सांगितले गेले. ही रक्कम त्याच्या ग्रॅच्युइटी आणि सुट्ट्यांच्या पैशांतून कापली गेली आणि उर्वरित रक्कम टीसीएसने वसूल केली. एकेकाळी मोठ्या प्रकल्पाचा भाग असलेला तो सध्या बेरोजगार असून, तो आपल्या पत्नी आणि मुलांना अजूनही सत्य सांगू शकलेला नाही.

इतर कर्मचा-यांनीही अशाच तक्रारी केल्या आहेत. त्यांना अचानक एचआरकडून फोन येतात, त्यांच्या सिस्टीमचा क्सेस काढून घेतला जातो किंवा 'मूनलायटिंग'चे (एकाच वेळी दोन ठिकाणी काम करणे) खोटे आरोप केले जातात. अनेक कर्मचा-यांच्या म्हणण्यानुसार, टीसीएसचे व्यवस्थापक एक गोपनीय 'फ्लुइडिटी लिस्ट' ठेवतात. ज्या कर्मचा-यांची नोकरी जाण्याची शक्यता आहे, त्यांची नावे त्यात असतात. त्या कर्मचा-यांना स्वेच्छेने राजीनामा देण्यासाठी ३० दिवसांची मुदत दिली जाते, अन्यथा त्यांना काढून टाकले जाते.

एका वर्तमान कर्मचा-याने कंपनीतील भीतीचे वातावरण सांगितले. तो म्हणाला, एकामागून एक टीम पूर्णपणे काढून टाकल्या जात आहेत... नवीन तंत्रज्ञानावर काम करणारे लोकही सुरक्षित नाहीत. ८-१० वर्षांचा अनुभव असलेले सहकारीही अचानक कामावरून काढले जात आहेत. कर्मचा-यांच्या या स्पष्टीकरणावरून या निर्णयामुळे केवळ आकडेवारीवर नाही तर कर्मचा-यांच्या मानसिक आणि आर्थिक आरोग्यावरही परिणाम होत आहे. नोकरी गमावलेले अनेक मध्यम स्तरावरील व्यावसायिक अनिश्चिततेच्या गर्तेत सापडले आहेत, कारण सध्या आयटी क्षेत्रात भरती थांबली आहे. सध्या तरी, भारतातील सर्वात मोठ्या आयटी कंपनीत भीतीचे वातावरण आहे आणि कर्मचारी स्वतःला विचारत आहेत, पुढचा नंबर कुणाचा आहे?

जुलै महिन्यात टीसीएसने या नोकरकपातीचा निर्णय धोरणात्मक बदल असल्याचे स्पष्ट केले होते. एआय, ऑटोमेशन आणि डिजिटल परिवर्तनाकडे कंपनी वळत असल्याने काही भूमिका अनावश्यक झाल्या आहेत, असे कंपनीचे म्हणणे आहे. कंपनीने म्हटले, ज्या कर्मचा-यांची नियुक्ती शक्य नाही, त्यांना आम्ही कामावरून कमी करत आहोत. या २ टक्के कपातीचा सर्वाधिक परिणाम मध्यम आणि वरिष्ठ स्तरावरील कर्मचा-यांवर होण्याची शक्यता आहे, विशेषतः जे जास्त काळ 'बेंच'वर होते. या नोकरकपातीवर अनेक आयटी कर्मचारी संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी या कपातींना 'अपारदर्शक' आणि 'अनैतिक' म्हटले आहे.

टीसीएसमधील ही कपात भारतातील २५० अब्ज डॉलर्सच्या आयटी क्षेत्रातील मोठ्या अनिश्चिततेच्या लाटेचा भाग आहे. जागतिक तंत्रज्ञान खर्चातील घट आणि एआयमुळे पारंपरिक भूमिकांची मागणी कमी होणे, ही प्रमुख आवाहने आहेत. इन्फोसिस, विप्रो आणि एचसीएलटेक सारख्या इतर कंपन्यांनीही खर्च कमी करण्याचा निर्णय घेतला आहे, पण टीसीएसची कृती, तिचे मोठे प्रमाण आणि प्रक्रियेतील गुप्ततेमुळे वेगळी ठरते. तज्ञांच्या मते, या नोकरकपाती आयटी उद्योगातील कायमस्वरूपी संरचनात्मक बदलाचे संकेत आहेत. कौशल्य विकास महत्त्वाचा ठरणार असून, एआय आणि क्लाउड भूमिकांशी जुळवून घेण्यात अपयशी ठरणा-या मध्यम स्तरावरील कर्मचा-यांना अधिक धोका आहे.

टीसीएसने काहीही स्पष्टीकरण दिलं असलं तरीही टीसीएसच्या जगभरातील सुमारे १२,००० कर्मचा-यांच्या नोक-यांवर गदा आली आहे, जी कंपनीच्या इतिहासातील सर्वात मोठी कपात ठरली आहे. टीसीएसने कर्मचारी कपात केल्यावर नोकरदारांच्या जीवाला घोर लागला आहे. ज्यापैकी बहुतेक मध्यम आणि वरिष्ठ स्तरावरील कर्मचारी आहेत. कंपनीने अलीकडेच नफ्यात ६ टक्के वाढ नोंदवली असताना कंपनीने कर्मचा-यांना अखेरचा 'टाटा' करायचा निर्णय घेतला आहे. म्हणजेच नफा वाढत आहे, परंतु नोक-या कमी होत आहेत, हा विरोधाभास लोकांना त्रास देत आहे. तर दुसरीकडे सीईओ के कृतिवासन यांच्या वार्षिक उत्पन्नावर तीव्र टीका उमटल्या आहेत.

टीसीएसचे सीईओ के कृतिवासन यांना आर्थिक वर्ष २०२५ मध्ये मिळालेल्या एकूण पगारात १.३९ कोटी रुपये मूळ वेतन, २.१२ कोटी रुपये भत्ते आणि सुमारे २३ कोटी रुपये कमिशनचा समावेश आहे. हा पगार टीसीएसच्या कर्मचा-यांच्या पगारापेक्षा ३३० पटीने जास्त आहे. कृतिवासन व्यतिरिक्त टीसीएसचे माजी सीईओ आणि कार्यकारी संचालक एनजी सुब्रमण्यम यांना मे २०२४ पर्यंत ११.५५ कोटी रुपये पगार मिळाला होता, त्यानंतर कंपनीतील पदांवरून पायउतार झाले. यामध्ये ३० लाख मूळ वेतन, फायदे, भत्ते आणि भत्त्यांमध्ये ७.२४ कोटी आणि कमिशन म्हणून ४ कोटी रुपये मिळाले होते. त्याचवेळी, टीसीएसचे अध्यक्ष एन चंद्रशेखरन यांना २.१ लाख रुपये सिटिंग फी मिळाली पण त्यांना कोणतेही कमिशन मिळाले नाही. नॉन एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर

केकी मिस्त्री यांना एकूण ३.०६ कोटी मानधन मिळाले, ज्यामध्ये ३ कोटी रुपये कमिशन आणि ५.७ लाख रुपये सिटिंग फी चा समावेश आहे.

टीसीएस सीईओंच्या पगारावर एक्स वापरकर्ते संतापले आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले की, 'सीईओचा पगार २.५ कोटींवरून ३ कोटी झाला, काही फरक पडला नाही... पण १५ लाखांच्या पॅकेजच्या तुलनेत १२,००० लोकांचे शून्य उत्पन्न त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करेल.' दुस-याने असा उपहास केला की कंपनीला भविष्यासाठी तयार करायचे असेल तर १२,००० लोकांचे बलिदान देणे आवश्यक आहे. कंपनीचे 'आरोग्य' माणसांपेक्षा जास्त महत्त्वाचे आहे.

टीसीएस सारख्या स्थिर कंपनीत इतक्या मोठ्या प्रमाणात झालेल्या टाळेबंदीने संपूर्ण आयटी क्षेत्राला विचार करायला भाग पाडले आहे. टीसीएस सामान्यतः भारतीय आयटी क्षेत्राचा मजबूत आधारस्तंभ मानला जातो आणि नोकरीच्या सुरक्षेच्या बाबतीत सरकारी नोकरीच्या बरोबरीचा मानला जायचा. पण, आता अलिकडेच झालेल्या टाळेबंदीच्या घोषणेमुळे आयटी उद्योगात खळबळ उडाली असून लोकांचाही भ्रमनिरास होऊ लागला आहे. टीसीएस मधील संभाव्य ताळेबंदीचा परिणाम मध्यम ते वरिष्ठ पातळीच्या कर्मचा-यांवर होईल. यासोबतच काही कनिष्ठ कर्मचा-यांवरही याचा परिणाम होऊ शकतो जे बराच काळ 'बेंच'वर आहेत म्हणजेच कोणत्याही प्रकल्पावर सहभाग नाहीत. आता कंपनी चपळ व उत्पादन-केंद्रित दृष्टिकोनाकडे वाटचाल करत आहे. या बदलात पूर्वीसारखे बहुस्तरीय नेतृत्वाची आता गरज नाही, ज्यामुळे प्रकल्प आणि कार्यक्रम व्यवस्थापनासारख्या जुन्या भूमिका कमी होत आहेत.

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी - ७०५७१८५४७९**

# सर्वसामान्य कार्यकर्ता हाच भाजपाचा प्राण - आमदार बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** भारतीय जनता पक्षाचा खरा प्राण आणि आधारस्तंभ हा पक्षाचा तळमळीने काम करणारा सामान्य कार्यकर्ता आहे, इतर पक्षांचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण असेल हे वेगळं सांगण्याची गरज नाही इतर सर्वच पक्षांमध्ये घराणेशाही सुरू आहे परंतु भारतीय जनता पक्षामध्ये मात्र पुढचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण असेल हे निश्चितपणे सांगता येणार नाही जो कार्यकर्ता पक्षासाठी अहोरात्र मेहनत करेल अशा सर्वसामान्य कार्यकर्त्यापासून राष्ट्रीय अध्यक्ष पर्यंत पोहोचण्याची क्षमता असणारा कोणताही कार्यकर्ता भारतीय जनता पक्षात आपल्या स्वबळावर मोठा होऊ शकतो पंतप्रधान नरेंद्र मोदी हे याचे मूर्तिमंत उदाहरण आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

मंठा तालुक्यातील आरडा (खारी) येथे आयोजित भारतीय जनता युवा मोर्चा शाखा उद्घाटन कार्यक्रमात आमदार बबनराव लोणीकर यांनी भारतीय जनता पक्षात असणारे सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे महत्त्व अधोरेखित केले. भारतीय जनता युवा मोर्चा शाखेच्या उद्घाटन प्रसंगी युवा कार्यकर्त्यांशी संवाद साधताना आमदार बबनराव लोणीकर यांनी भारतीय जनता पक्ष हा सर्वसामान्य लोकांचा पक्ष आहे आणि युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी ही विचारधारा समाजात पोहोचवावी असेही स्पष्ट केले.

**कार्यकर्त्यांच्या योगदानाचा गौरव**

आमदार लोणीकर म्हणाले, भाजपला आज जागतिक स्तरावर जो मान मिळत आहे, तो केवळ मोठ्या नेत्यांमुळे नाही, तर प्रत्येक बुथवर निष्ठेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या अविरत प्रयत्नांमुळे. हा सामान्य कार्यकर्ता कोणताही स्वार्थ न ठेवता, पक्षाची विचारधारा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवतो. त्यांच्या या योगदानामुळेच पक्ष आज देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे.

**संघटन शक्तीवर भर**

आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी कार्यकर्त्यांना आवाहन केले की, त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या जन कल्याणकारी योजनांची माहिती घेऊन ती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवावी. कार्यकर्त्यांनी संघटनशक्ती अधिक मजबूत करावी आणि आगामी काळात पक्षाला अभूतपूर्व यश मिळवून देण्यासाठी सज्ज व्हावे, असे त्यांनी सांगितले.

**युवा शक्तीचे आवाहन**

आमदार लोणीकर म्हणाले, भाजपचे कार्य केवळ विशिष्ट गटापुरते मर्यादित नसून, ते समाजातील प्रत्येक घटकासाठी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्यात सर्वसामान्यांसाठी अनेक कल्याणकारी योजना यशस्वीपणे राबवल्या जात आहेत. या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याची आणि पक्ष अधिक बळकट करण्याची जबाबदारी युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांची आहे.

**नवीन शाखेचे उद्दिष्ट**

यावेळी लोणीकर यांच्या हस्ते नूतन भारतीय जनता युवा मोर्चा शाखेचे उद्घाटन झाले. युवकांनी केवळ समाज माध्यमांवर (सोशल मीडिया) सक्रिय न राहता, रस्त्यावर उतरून लोकांचे प्रश्न सोडवावे आणि संघटनेच्या माध्यमातून राष्ट्रनिर्माणाचे कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शाखाध्यक्ष: विठ्ठल कळणे, उपाध्यक्ष: रामप्रसाद अवचार, सरचिटणीस: पांडुरंग ढेंगळे, शरद ढेंगळे, चिटणीस: अर्जुन बहिरट, कोषाध्यक्ष: पंडित ढेंगळे तर सदस्य म्हणून बालासाहेब ढेंगळे अशोक कळणे दिगंबर ढेंगळे आतिश कळणे, जगन्नाथ करणे विलास खराबे कैलास कळणे ज्ञानेश्वर तळेकर ज्ञानेश्वर अवचार केदारनाथ कळणे अजय ढेंगळे अशोक ढेंगळे मुंजाभाऊ ढेंगळे भागवत ढेंगळे मुकुंद ढेंगळे आकाश ढेंगळे खंडू ढेंगळे वैजनाथ खराबे अचित कळणे भारत कळणे महादेव ढेंगळे विष्णू ढेंगळे यांची निवड करण्यात आली.

यावेळी सतीशराव निर्वळ तालुकाध्यक्ष नितीन राठोड पंजाबराव बोराडे कैलास बोराडे अजय अवचार नागेशराव घारे अमोल मोरे राजेभाऊ खराबे माऊली गोंडगे कैलास चव्हाण युवा मोर्चा मंठा तालुकाध्यक्ष आनंद जाधव जालना ग्रा. तालुकाध्यक्ष विलास घोडके मनोज देशमुख संजय गायकवाड पांडुरंग काळे रामकिसन मुसळे बंधू नाना खरात रावसाहेब बाहेकर वसंत बागल पंढरीनाथ कांगणे सरपंच रतन कळणे अरुण खराबे राजेभाऊ ढेंगळे सरपंच सुनील ठाकरे सुभाषराव बागल सुभासराव वायाळ बाळासाहेब तौर गजानन चव्हाण नायबराव गोंडगे लक्ष्मण बोराडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



## लहानशी पिगी बँक, पण मोठे हृदय; शेतकऱ्यांसाठी ५१०० रुपये दान

### आठ वर्षांच्या सुवाच्याचा समाजासाठी मोठा धडा



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यावर अलीकडच्या काळात आलेल्या अतिवृष्टी आणि ढगफुटीसदृश्य पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतीसह वाहून गेलेली पिकं आणि त्यामुळे उद्ध्वस्त झालेले शेतकऱ्यांचे आयुष्य पाहून अनेकांचे हृदय हेलावून गेले. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या मदतीसाठी अनेक जण पुढे सरसावले आहेत. लहानगे हातही मागे नाहीत. डॉ. सुयोग कुलकर्णी आणि डॉ. सौ. साक्षी कुलकर्णी यांची ८ वर्षीय कन्या कु. सुवाच्या हिने तिच्या पिगी बँकेत साठवलेले एकूण ५१०० रुपये आपतग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरिता जिल्हाधिकारी सौ. अशीमा मित्तल यांच्याकडे सुपूर्द केले. एका लहानग्या बालिकेने दाखवलेला समर्पण भाव सर्वांसाठीच प्रेरणादायी ठरला आहे.

अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी हृदयातून आलेली ही मदत केवळ आर्थिक नसून भावनिक बळ देणारी आहे. एक छोटी मुलगी जेव्हा तिचे लहानसे मोठेपण दाखवते, तेव्हा ते संपूर्ण समाजासाठी मोठा आदर्श ठरतो. शेतकरी भला, तो देश भला हा संदेश मनाशी ठेवून एवढ्या लहान वयात समाजासाठी केलेले हे योगदान कौतुकास्पद आहे. जिल्हाधिकारी सौ. अशीमा मित्तल यांच्याहस्ते ही रक्कम सुपूर्द करताना तिच्या डोळ्यांत देशभक्तीची आणि सामाजिक बांधिलकीची भावना दिसून आली. आई आणि वडिलांच्या समाजाभिमुख कार्यातून प्रेरणा घेऊन तिने स्वतःच्या इच्छेने ह्या मदतीचा निर्णय घेतला. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. तोच आज संकटात सापडल्याने छोटीशी का होईना मदतीची प्रेरणा मिळाल्याचे सुवाच्या म्हणाली. तिच्या या उपक्रमाबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.


## अतिवृष्टी व ढगफुटीला गंभीर नैसर्गिक आपत्ती घोषित करून तिप्पट मदत द्यावी

### डॉ. संजय लाखे पाटील यांची मुंबई उच्च न्यायालयात याचिका

**जालना । प्रतिनिधी -** अतिवृष्टी, अचानकचा प्रचंड पाऊस, आलेला महापूर व ढगफुटी या आपत्ती व्यवस्थापन कायद्या अंतर्गतच्या सुचीबद्ध नैसर्गिक आपत्ती असून शासन आदेशान्वये यास गंभीर नैसर्गिक आपत्ती जाहीर करून २०१९ च्या कोल्हापूर महापुरामध्ये घोषित एनडीआरएफ निकषांच्या तिप्पट मदत देण्याचे आदेश महाराष्ट्र सरकारला द्यावेत, अशी मागणी करत शेतकरी, फळबागायतदार आणि मराठवाडा अनुशेष निर्मूलन व विकास मंच चे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली आहे.

याचिका (स्टॅम्प क्र. ३००२१) दाखल करून त्यावर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी जेष्ठ वकील ड. विश्वंभर डी. गुणाले यांनी न्यायमूर्ती विभा कनकनवाडीकर आणि न्या. कडेठाणकर यांच्या मुख्य खंडपीठासमोर केली.

डॉ. लाखे पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशाच्या संसदेने मंजूर केलेल्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, राष्ट्रीय व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, राष्ट्रीय व राज्य आपत्ती व्यवस्थापन आराखडे तसेच पुर आणि दुष्काळ व्यवस्थापन मार्गदर्शिका या सर्व अनिवार्य कायदेशीर चौकटी आहेत. अचानकचा महापाऊस, महापूर व ढगफुटी (Flash Rain, Flash Flood, Cloudburst) या सुचीबद्ध नैसर्गिक आपत्ती ठरतात आणि त्यांना एनडीआरएफ मदत मिळण्यास पात्रता आहे.



मात्र, दुष्काळ-पुर व्यवस्थापन मॅन्युअलप्रमाणे ५०% पेक्षा जास्त पिकांचे नुकसान झाल्यास ऑगस्ट अखेरीस वा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात आपत्ती जाहीर करणे बंधनकारक आहे. तरीदेखील महाराष्ट्र सरकार वा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी आपत्ती जाहीर न करता केवळ शब्दच्छल केला असून हे आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा आहे, असा गंभीर आरोप डॉ. लाखेपाटील यांनी केला आहे.

याचिकेत पुढे नमूद केल्याप्रमाणे, सध्याच्या अतिवृष्टीमुळे आणि महापुरामुळे शेती, जनावरे, खरिप पिके, फळबागा, भाजीपाला, रोजगार, मजुरांचा उपजीविका, घरं, दुकाने, गोठे, ग्रामीण व्यवसाय यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने २०१९ च्या सांगली-कोल्हापूर महापुरातील मदतीच्या तिप्पट निकषांनुसार शेतकऱ्यांना व नागरिकांना तात्काळ मदत द्यावी, अशी आग्रही मागणी डॉ. लाखेपाटील यांनी केली आहे.

डॉ. लाखे पाटील यांनी स्पष्ट केले की, देशाच्या आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या तरतुदींचे पालन करणे राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासनाला बंधनकारक आहे. मात्र, या तरतुदींची पायमल्ली करून आपत्तीग्रस्तांना न्याय न देणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाने याची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांच्या व पीडित जनतेच्या हिताचे आदेश द्यावेत.



## जालना शहरातील छत्रपती संभाजी महाराज विसर्जन कुंडावर देवींचे विसर्जन विधी संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील छत्रपती संभाजी महाराज विसर्जन कुंड येथे नवरात्रीत स्थापित झालेल्या देवींच्या मूर्तींचे विसर्जन मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाले. नवरात्रोत्सवाचा समारोप करताना महिला व पुरुष भक्तगणांनी एकत्रितपणे देवींच्या आरत्या म्हटल्या, ढोल-ताशांच्या गजरात जय माता दी अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. शहरातील विविध मंडळांच्या मूर्तींचे नियोजित पद्धतीने विसर्जन करण्यात आले. पोलिस प्रशासन, मनपा कर्मचारी व स्वयंसेवी संस्थांनी विसर्जन स्थळी योग्य व्यवस्था केली होती. विसर्जन स्थळी गर्दी नियंत्रणासाठी पोलीस बंदोबस्त तैनात होता.





## श्रीमती अयोध्याबाई काबरा यांचे निधन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील म्हाडा कॉलनी संभाजी नगर येथील रहिवाशी अयोध्याबाई ओंकारदास काबरा यांचे (ता.३) शुक्रवारी वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यु समयी त्यांचे वय ९२ वर्ष होते.त्यांची अंत्ययात्रा उद्या (ता.४) शनिवारी सकाळी १० वाजता म्हाडा कॉलनी,संभाजीनगर येथील निवास स्थानावरुन निघणार असुन त्यांच्या पार्थीवावर अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. मरणोत्तर त्यांनी नेत्रदान केले. त्यांच्या पश्चात ५ मुले, १ मुलगी, सुना, जावई नातवंडे असा मोठा परीवार आहे. डॉ.शांतीलाल, अशोककुमार, अरविंद, कमलकिशोर, संजय काबरा यांची आई तर सुंदरविलास, विजय, प्रशांत, प्रवीण, रणजीत, अतिश, सचिन, जगदीश, घनश्याम, अनिल, राधेश्याम, शुभम काबरा यांच्या त्या आजी होत.



## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेतंर्गत ग्रंथभेट योजनेसाठी निवड झालेला ग्रंथांची यादी प्रसिध्द

**जालना । प्रतिनिधी -** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकाता व राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून ५० व्या ग्रंथभेट योजनेतंर्गत सन २०२३ मध्ये प्रकाशित व संचालनालयास प्राप्त झालेल्या ग्रंथापैकी राज्य ग्रंथालय नियोजन समितीच्या उपसमिती सदस्यांनी निवड केलेल्या १३८८ ग्रंथांची यादी ग्रंथालय संचालनालयाच्या www.dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि.१५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत अवलोकनार्थ खुल ठेवण्यात आली आहे. या ग्रंथ यादीतील ग्रंथ किमान २५ टक्के सुट दराने वितरीत करणे बंधनकारक आहे. या यादीत ग्रंथाचे नाव, लेखक, प्रकाशक व किंमत यामध्ये काही बदल असल्याचे निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.